RNI No. MAHBIL/2009/31747
Reg. No. MH/MR/South-326/2013-15

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक–ल

वर्ष ६, अंक ४५] बुधवार, ऑगस्ट १३, २०१४/श्रावण २२, शके १९३६ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १६.००

असाधारण क्रमांक २४५

### प्राधिकृत प्रकाशन

(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १३ ऑगस्ट २०१४

अधिसूचना

**इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६.**

क्रमांक इमारत. २०१४/प्र.क्र. १४८/कामगार-७.—इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ (१९९६ चा २७) च्या कलम ६२ च्या पोट-कलम १२ चा खंड (१) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, सदर अधिनियमाच्या कलम (५) अन्वये तज्ज्ञ समितीचा सल्ला विचारात घेतल्यानंतर, महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :–

१. या नियमांना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) (सुधारणा-१) नियम, २०१४ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ च्या नियम ३३ मध्ये (यात यापुढे ज्याचा "मुख्य नियम" असा उल्लेख करण्यात आलेला आहे)–

(१) पोट-कलम (३) मध्ये,–

(अ) खंड (ग), ऐवजी पुढील खंडाचा समावेश करण्यात येत आहे :–

"(ग) नियोक्त्यामार्फत देण्यात आलेले प्रमाणपत्र, आणि, ज्या बांधकाम व इतर बांधकाम कामगारांचे काम स्थायी नसलेले/अस्थायी/दैनंदिन (Casual) स्वरूपाचे काम आहे आणि त्यामुळे कामगारांना एकापेक्षा जास्त मालकांकडे काम करावे लागते अशा इमारत व इतर बांधकाम कामगाराला संबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक किंवा संबंधित नगरपालिकेच्या/नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्याने प्राधिकृत केलेला अधिकारी किंवा संबंधित महानगरपालिकेच्या आयुक्तांनी प्राधिकृत केलेला अधिकारी यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र ;" :

(ब) खंड (घ) नंतर, पुढील खंड आणि स्पष्टीकरणाचा समावेश करण्यात येत आहे :–

"(च) वास्तव्याचा अधिकृत पुरावा ;

(छ) अधिकृत फोटो असलेल्या ओळखपत्राचा पुरावा.

**स्पष्टीकरण.**—खंड (छ), (घ) व (छ) च्या प्रयोजनार्थ, अर्जदाराने मतदान ओळखपत्र किंवा पॅन कार्ड किंवा बँकेचे पासबुक किंवा आधारकार्ड पत्र किंवा आधारकार्ड जमा करणे आवश्यक राहील ";



Scanned by CamScanner



(२) पोट-कलम (४) मध्ये, मंडळाने संमित या शब्दानंतर " किंवा प्राधिकृत जिल्हा अधिकारी " या शब्दांचा समावेश करण्यात येत आहे.

३. मुख्य नियमातील नियम ४२ च्या उप-नियम (१) मध्ये पुढील तरतुदीचा समावेश करण्यात येत आहे :–

"परंतु, काही कारणास्तव, जेव्हा मंडळावर मालक किंवा बांधकाम कामगार यांचे प्रतिनिधी नामनिर्देशित केलेले नसतील तेव्हा, कार्यरत सदस्य संख्येच्या १/३ (एक तृतीयांश) एवढी असणे आवश्यक राहील.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

दि. सो. राजपूत,
शासनाचे उप सचिव.

Scanned with OKEN Scanner